S. P. Mandali's

# R. A. Podar College of Commerce & Economics

Matunga, Mumbai-400019

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

### ( For General Category )

अनुदानित व विनाअनुदानित ( व्यावसायीक व बिगर व्यावसायीक) अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या
"आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता (EBC) 'वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'

| अ,क्र. | प्रकार | कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मयार्दा | वसतिगृह ठिकाण | अभ्यासक्रमासाठी निर्वाह भात्याची रक्कम |
|---|---|---|---|---|
| व्यावसायीक अभ्यासक्र | | | | |
| ०१ | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | निरंक | मुंबई | ३०,०००/- |
| ०२ | इतर विद्यार्थांसाठी | रु.१.०० लाखापर्यंत | मुंबई | २०,०००/- |
| ०३ | इतर विद्यार्थांसाठी | रु.१.०० लाख ते ८.०० लाख | मुंबई | १०,०००/- |
| बिगर व्यावसायीक अभ्यासक्र | | | | |
| ०४ | विद्यार्थी | रु.१.०० लाखापर्यंत | - | २,०००/- |

**पात्रता (शासन निर्णय दिनांक ७/१०/२०१७ प्रमाणे) :**

१.विद्यार्थाने शासकीय / निम शासकीय/ खाजगी वसतिगृहामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थाने त्याबाबतचा पुरावा अर्जासोबत सादर करणे आवशक आहे

2. तसेच खाजगी मालकीच्या घरामध्ये विद्यार्थ्याने स्वताची राहण्याची सोय केली असल्यास त्या विद्यार्थ्याने अश्या विद्यार्थ्यास नोंदणीकृत अथवा नोटराईज्ड भाडे कराराची प्रत अर्जासोबत सादर करणे आवशक आहे

३. एखाद्या विद्यार्थ्याने सामान्य रहिवाशी असलेल्या त्याच्या गावातील शहरातील संस्थेमध्ये अभ्यासक्रमासाठी प्रवेस घेतल्यास त्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

४. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित आहे.

५. एखाद्या विद्यार्थ्यास अन्य कोणत्याही योजनेखाली निर्वाह भत्ता मिळत असल्यास असा विद्यार्थी या योजनेखाली लाभ मिळण्यास अपात्र आहे.

६. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीकारीकच निर्वाहभत्ता देण्यात येतो. तथापि एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास अथवा काही कारणामुळे त्याला वरच्या वर्गात प्रवेश न मिळाल्यास त्यास त्या वर्षापुरता निर्वाह भत्ता लाभ अनुज्ञेय नाही.

७. या योजनेअंतर्गत रुपये १.०० लाखपर्यंत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाहभत्त्याच लाभ देण्याकरिता संख्येची कोणतीही मर्यादा असणार नाही. मात्र रुपये १.०० लाख ते रुपये ८.०० लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या व व्यावसायीक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्ह्यासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांची कमाल संख्या ५०० इतकी निश्चित करण्यात येत आहे. त्यापैकी ३३% इतक्या जागा विद्यार्थिनीकारिता राखीव ठेवण्यात येतात. तथापि पुरेशा विद्यार्थिनी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहणाऱ्या जागा त्याच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरीता उपयोगात आणता येतात.

८. प्रत्येक जिल्ह्यातील कोटा हा प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या संख्येनुसार प्रमाणशीररित्या (Proportionate) निचित करण्यात येतो.

**आवश्यक कागतपत्रे (Documents Required) :**

१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवस प्रमाणपत्र
२. पालकाचे अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर असल्याचे प्रमाणपत्र
३. शैक्षणिक वर्ष्याच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबधित तहसीलदार अथवा सक्षमस अधिकार-याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र
४. गॅप संबधित दस्तऐवज (गॅप असल्यास)
५. दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र